सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**

# महाराष्ट्र लोकसेवा आयोग

मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ☏२२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ☏२२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

क्र.-३७४(१)/२०२०/१४-ब दिनांक:-०३ सप्टेंबर, २०२१

## -: प्रसिध्दीपत्रक :-

विषय:- महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा संयुक्त पूर्व परीक्षा २०२० निकालाबाबत
संदर्भ:- जाहिरात क्र. ०६/२०२०

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत दिनांक २७ मार्च, २०२१ रोजी घेण्यात आलेल्या महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा संयुक्त (पूर्व) परीक्षा-२०२० चा निकाल दिनांक ०३ सप्टेंबर, २०२१ रोजी जाहीर करण्यात आला आहे. सदर पूर्व परीक्षेत अर्हताप्राप्त ठरलेल्या उमेदवारांच्या बैठक क्रमांकाची यादी व गुणांची सीमारेषा आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे.

**२.** प्रस्तुत पूर्व परीक्षेसाठी उमेदवारांनी ऑनलाईन पध्दतीने केलेल्या अर्जात दिलेल्या माहितीच्या आधारे, त्यांची पात्रता तपासण्याच्या अटीच्या अधीन राहून, पूर्व परीक्षेच्या निकालाआधारे मुख्य परीक्षेस प्रवेश देण्यात आला आहे. पात्र ठरलेल्या उमेदवारांपैकी विहित कालावधीत मुख्य परीक्षेसाठी अर्ज करणा-या व परीक्षा शुल्क भरणा-या अर्हताप्राप्त उमेदवारांनाच मुख्य परीक्षेस प्रवेश देण्यात येईल. विचाराधीन परीक्षेच्या खेळाडूकरीता आरक्षित पदासाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांच्या क्रिडाविषयक दाव्यांची/कागदपत्रांची वैधता तपासण्याच्या अधीन राहून मुख्य परीक्षेकरीता केवळ तात्पुरता प्रवेश देण्यात आला आहे.

**३.** प्रस्तुत परीक्षेचा निकाल विविध मा. न्यायालयात/ मा. न्यायाधिकरणात दाखल करण्यात आलेल्या न्यायिक प्रकरणातील अंतिम न्यायनिर्णयाच्या अधीन राहून जाहीर करण्यात आला आहे.

**४.** प्रस्तुत पूर्व परीक्षेच्या निकालाच्या आधारे मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांना वैयक्तिकरित्या आयोगाकडील नोंदणीकृत मोबाईल क्रमांकावर लघुसंदेशाद्वारे (एस.एम.एस.) कळविण्यात येईल. त्यावेळी उमेदवाराने मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी आयोगाने विहित केलेल्या ऑनलाईन पध्दतीने परीक्षा केंद्र निवडून परीक्षा-शुल्क सादर करणे आवश्यक राहील. त्याशिवाय उमेदवारास मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र समजण्यात येणार नाही.

ठिकाण:- मुंबई

उपसचिव (परीक्षा- २)
महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.